
# अटक मटक


वृंदा लिमये



BVBK-0402930

बा.वा.
२९३०
१५/३/९४

बाल वाङ्मय
क्र. २९३० दिनांक १५/३/९४
विषय बा.वा.



# अटकमटक

वृंदा लिमये

BVBK-0402930

मुखपृष्ठ, रेखाटन, मांडणी:
साईनाथ रावराणे

अक्षर प्रकाशन

बाल वाङ्मय विभाग
क्र. २९३० दिनांक १५/३/९४
विषय बा.वा.

**अटक मटक**

चि. ऋतुजा

हिच्यासाठी

## अटक मटक



अटक मटक
भेळ चटक
भेळ लागली
तिखट तिखट

त्यावर चॉकलेट
गोड गोड
हात झाले
चिकट चिकट

## इट्टुक मिट्टुक



इट्टुक मिट्टुक
चिंचेचं बोट्टुक

तिख्खट मीठ
मसाला नीट

चाखत माखत
डोळ्यादेखत

ब ब भट्टा
चट्टामट्टा



## लाडीगोडी

आई ग, मला सापडली बघ
रस्त्यात एक पावली
कोपऱ्यावरच्या आंधळयाच्या
हातावर मी ती ठेवली

आई ग, आपल्या शेजाऱ्यांची
हरवलेली किल्ली
अंगणामध्ये सापडली मला
नेऊन त्यांना दिली

आई ग, मला सापडलं बघ
कुत्र्याचं हे पिल्लू
तुझ्याचसाठी आणलंय त्याला
खायला काय घालू?


## खेळण्यांच्या राज्यात

एकदा एक भावली
धाव धाव धावली
म्हणाली, ''नाही गावली
मला माझी सावली''

एकदा एक भोवरा
कावरा बावरा
म्हणाला, ''येतेय भोवळ
कुणीतरी सावरा''

एकदा एक चेंडू
बॅटीशी लागला भांडू
म्हणाला शेवटी सगाने
''मारीन तुला दांडू''

एकदा एक बाजा
म्हणाला, ''बघा माझा
जगात सगळ्यांपेक्षा
जास्त गाजावाजा



# रंग

इकडे करा कान जरा
तुम्ही व्हाल थक्क
कधी कधी एकसाथ
रंग गातात चक्क

एका सुरात जेव्हा घेतात
लांबलचक तान
इंद्रधनूची उमटते
आभाळात कमान



## देवाण घेवाण

राजा नि राणी
यांची कहाणी
बदल्यात चिंकू
गाते गाणी

बाहुला बाहुली
चेंडू नि शिट्टी
बदल्यात चिंकू
मारते मिठी


गुलाब नि मोगरा
कवठी चाफा
बदल्यात चिंकू
देते पापा



## वारा कुजबुजतो कानात

वारा कुजबुजतो कानात
गवत डोलवते मान
डहाळीवरचा निळा पक्षी
घेऊ लागतो तान

वारा कुजबुजतो कानात
पाण्यावर तरंग थर्रकन्
पानाआडची गुलाबकळी
हसते कशी खुदकन्






## दिवाळीचं दारूकाम

फट् फट् फटाका
त्याचा धुमधडाका
झगमग फुलझडी
भरजरी ऐट बडी

सर सर पेटले झाड
उंच झाले ताडमाड
सूं सूं गेला बाण
सगळ्यांच्या हा वरताण



## पावसा पावसा

पावसा पावसा पड रे पड
चांगला मुसळधार
अवती भवती करून टाक
सारं हिरवंगार

इकडे तिकडे सगळीकडे
होऊ दे पाणीच पाणी
नावा सोडू नाचू खेळू
आणि गाऊ गाणी

पावसा पावसा गुपित सांगू?
करीन तुझ्याशी गट्टी
शाळेला जर का आमच्या तू
द्यायला लावशील सुट्टी

# एकी एक दुर्की दोन




एकी एक
दुर्की दोन
खेळायला सांगा
येतंय कोण?

तिर्की तीन
चौकी चार
रमीचा डाव
धम्माल फार

पंची पाच
छक्की सहा
काय पण पाने
वेचक पहा

सत्ती सात
अट्ठी आठ
शक्कल माझी
सगळे चाट

नव्वी नऊ
दश्शी दहा
जिंकला डाव
हाः हाः हाः





## प्रवासस्वप्ने

झुलत्या घोड्यावर
होऊन स्वार
डोंगर नि दऱ्या
करू या पार


छोटी मोटर
पळवू या
वाटेल तिकडे
वळवू या

आगगाडीतून
भर वेगात
पालथे घालू
देश जगात

आगबोटीतच
घर मांडू
सात समिंदर
ओलांडू

जंबो जेट
उडवू या
पृथ्वी प्रदक्षिणा
घडवू या

सर्वांवर कडी
अंतराळयान
चंद्रावरती
करू प्रयाण




## काजवे

ठिणगीला फुटले पंख
पंख लागले झुलू
प्रकाशाच्या फुलाफुलांनी
झाड आले फुलू

चमचमणारी रोषणाई
शोभिवंत आरास
लखलखणाऱ्या हिऱ्यांची या
कुणी उधळली रास?

कुणी केला जादूमय हा
प्रकाशाचा उत्सव?
कुणी केले असे खुले
रानपऱ्यांचे वैभव?





## काळजी

बाबांचे आमच्या
गणितच कच्चे
बेरीज करताना
विसरतात हात्‌चे

इतके वाईट अक्षर
काढते आमची आई
मास्तरांना मुळीच
वाचायला येत नाही

अभ्यासाचा माझा.
गोंधळ हा असा
सांगा बरे आता मी
पास होणार कसा?

# विक्षिप्तरावांचा कुत्रा



विक्षिप्तरावांना शोभेसाच
आहे त्यांचा कुत्रा
मुलखावेगळा प्राणी त्याच्या
खोडी आहेत सत्रा

कुंपणावर दिवसभर
उगीच भुंकत बसतो
रात्री मात्र अंगणातच
चक्क घोरत असतो

बिनओळखीच्या माणसांशी हा
करतो लाडीगोडी
घरातल्यांच्याबद्दल मात्र
याला माया थोडी

सगळ्यावर कडी म्हणजे हा
विक्षिप्तरावांचा कुत्रा
चोरांना पाहून जातो पळून
असला आहे भित्रा

तरीसुद्धा विक्षिप्तरावांच्या
गळ्यातला तो ताईत
कशाकरता ठेवलाय कुत्रा
त्यांचे त्यांना माहीत




## शाळेची वेळ

पिंजऱ्यामधल्या दांडीवरती
पोपट होता पाढे म्हणत
मांजर होती गालिच्यावर
मजेत इवले मोजे विणत

कौलावरती केव्हापासून
कबूतर होते बसले कण्हत
बागेमध्ये झुडुपाआड
उंदीर होता बीळ खणत

चिमणी होती अंगणामध्ये
चिवचिव गाणे गुणगुणत
मैना होती ठुमकत पायी
घुंगरवाळा रुणझुणत

''खेळ पुरे हं! वेळ शाळेची...''
बाळ होता तणतणत
पलीकडे शाळेमध्ये
घंटा होती घणघणत



## चिडवाचिडवी

घराच्या डोक्यावर
बसले छप्पर
म्हणाल्या भिंती
''तू अगदी ढफ्फर!''

वेडावून दाखवीत
ओठांचा चंबू
म्हणाले छप्पर
''तुम्हीच येडबंबू!''

## मजाच मजा

बाबांच्या नव्या कॅमेऱ्याशी
खेळायला मिळते मला
रोज सकाळी जेव्हा ते
जातात ऑफिसला

आईच्या धारदार कात्रीने कागद
कापायला मिळतात मला
जेव्हा जाते बाजारात ती
सामान आणायला

आजोबांची नक्कल चष्मा घालून
करायला मिळते मला
जेव्हा ते काठी टेकीत टेकीत
जातात फिरायला

मोठी माणसे बाहेर गेली की
शाळेला मिळावी रजा
तस्सा होतो खूप खूप आनंद
आणि मजाच मजा




## गणपतिबाप्पा

गणपतिबाप्पा मोरया
वाजत गाजत लवकर या
तुमच्यासाठी लाल फुले ही
मखर तोरणे माळा या

खिसमिस आणिक खोबरे खारीक
मस्त खिरापत होऊ द्या
एकवीस मोदक नैवेद्याला
प्रसाद आम्हा खाऊ द्या

नाटक जादू नकला गाणी
उत्सवामध्ये मिरवू द्या
मंत्रपुष्प अन् देवे आरती
धूमधडाका होऊ द्या

गमतीजमती अवतीभवती
मनासारख्या होऊ द्या
गणपतिबाप्पा मोरया
वाजत गाजत लवकर या





## सोबत

वाऱ्याची सळसळ भोवताली रात्री
भुताटकीचे होतात भास
''भिऊ नकोस,'' चांदोबा म्हणतो,
''मंत्र आहे ना माझा खास''

गोष्टीमधल्या चेटकिणीसारख्या
भिंतीवर हलतात सावल्या
''भिऊ नकोस,'' चांदोबा म्हणतो,
''जादूने करीन त्या भावल्या''

काळोखाचा भला मोठा राक्षस
बसलाय धरून दबा
''भिऊ नकोस,'' चांदोबा म्हणतो,
''मी आहे ना जवळच उभा''

